## The Nashik District Central Co-op. Bank Ltd., Nashik

Head Office, Old Mumbai Agra Road, Near C.B.S. Nashik-422002
Ph. No.- 0253 2504381, Email - ceo@nashikdccbank.com, Website -www.nashikdccbank.in

**TENDER NOTICE FOR SALE OF IMMOVABLE PROPERTY**

The Nashik District Central Co-op. Bank Ltd., Nashik hereby invites Bids/Offers in sealed envelope for sale of Land & Building of **Renuka Devi Audyogik Sahakari Sanstha** Ltd., Dyane Tal.Malegaon Dist.Nashik as per the provisions of the SECURITIZATION & RECONSTRUCTION OF FINANCIAL ASSETS & ENFORCEMENT OF SECURITY INTEREST ACT, 2002(SARFAESI ACT 2002). The Schedule of program are as follows.

| Sr.No. | Details | Date |
|---|---|---|
| 1 | Buy/Download Tender Document | 14/02/2024 to 05/03/2024 by 10:30 am-5:30 pm |
| 2 | Inspection of the Property | 14/02/2024 to 05/03/2024 by 10:30 am-5:30 pm |
| 3 | Submission of Tender | On or Before 05/03/2024 By 5:30 pm |
| 4 | Bid Opening Date | 06/03/2024 at 12:00 pm |
| 5 | Contact Officer | Shri.Gorakh Ramchandra Jadhav, Authorised Officer/Divisional Officer,Malegaon Division, Malegaon Mob.No. 9823730933 |

The detailed Terms & Conditions, guidelines and further details are available on banks official Website: www.nashikdccbank.in from 30/11/2023 onwards.

Date : 14/02/2024
Place : Nashik

Sd/-
G. R. Jadhav
Authorised Officer & Divisional Officer,Malegaon
The Nashik District Central Co-op Bank Ltd., Nashik

## GE Power India Limited

**CIN:** L74140MH1992PLC068379
**Regd Office:** Regus Magnum Business Centers, 11th floor, Platina, Block G, Plot C-59, Bandra Kurla Complex, Bandra East, Mumbai, Maharashtra, India - 400051. **Website:** https://www.ge.com/in/ge-power-india-limited; **E-Mail ID**: in.investor-relations@ge.com

**Extract of Statement of Standalone and Consolidated unaudited Financial Results for the quarter and nine months ended 31 December 2023**

(₹ Millions, except per share data)

| Sl. No. | PARTICULARS | Quarter ended 31.12.2023 | Nine Months ended 31.12.2023 | Quarter ended 31.12.2022 | Quarter ended 31.12.2023 | Nine Months ended 31.12.2023 | Quarter ended 31.12.2022 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Standalone | | | Consolidated | | |
| 1. | Total income from operations | 4,912.4 | 12,957.6 | 5,445.1 | 4,912.4 | 12,957.6 | 5,445.1 |
| 2. | Net profit / (loss) for the period (before tax, exceptional and/or extraordinary items) | -18.6 | -2,001.7 | -194.7 | 3.7 | -1,972.7 | -188.3 |
| 3. | Net profit / (loss) for the period before tax (after exceptional and/or extraordinary items) | --18.6 | -2,001.7 | -301.6 | 3.7 | -1,972.7 | -295.2 |
| 4. | Net profit / (loss) for the period after tax (after exceptional and/or extraordinary items) | -18.6 | -2,001.7 | -1,399.3 | 3.7 | -1,972.7 | -1,392.9 |
| 5. | Total comprehensive income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and other Comprehensive Income (after tax)] | -25.0 | -2,021.1 | -1,400.0 | -2.7 | -1,992.1 | -1,393.6 |
| 6. | Equity share capital | 672.3 | 672.3 | 672.3 | 672.3 | 672.3 | 672.3 |
| 7. | Reserves excluding revaluation reserve* | - | - | - | - | - | - |
| 8. | Earnings per share (of ₹ 10/- each) (for continuing and discontinued operations) - | | | | | | |
| | Basic: | -0.28 | -29.78 | -20.81 | 0.06 | -29.34 | -20.72 |
| | Diluted: | -0.28 | -29.78 | -20.81 | 0.06 | -29.34 | -20.72 |

*Reserves excluding Revaluation Reserve for the period ended as on 31 March 2023 was ₹ 1595.0 millions

Note:

a) The above is an extract of the detailed format of Financial Results for quarter and nine months ended 31 December 2023 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Financial Results for the quarter and nine months ended 31 December 2023 are available on the Stock Exchange websites. (www.bseindia.com / www.nseindia.com) and on the website of the Company (www.ge.com/in/ge-power-india-limited).

b) The above results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on 12 February 2024. The results for the current quarter and nine months ended 31 December 2023 have been limited reviewed by the Statutory Auditors of the Company.

c) Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

**For and on behalf of the Board**
**(PRASHANT CHIRANJIVE JAIN)**
**Managing Director**
DIN 06828019

Place : Noida
Date : 12 February 2024

## INTRASOFT TECHNOLOGIES LIMITED

Registered Office : 502A, Prathamesh, Raghuvanshi Mills Compound,
Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai 400 013.
Tel : 91-22-4004-0008. Fax : 91-22-2490-3123, Email : intrasoft@itlindia.com,
Website : www.itlindia.com **CIN : L24133MH1996PLC197857**

**STATEMENT OF UNAUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31 DECEMBER 2023**

₹ *In Lakhs*

| | PARTICULARS | Quarter Ended | | | Nine Months ended | | Year Ended |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 31-12-2023 | 30-09-2023 | 31-12-2022 | 31-12-2023 | 31-12-2022 | 31-03-2023 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Audited) |
| | **Income** | | | | | | |
| I | Revenue from Operations | 12299.38 | 12054.85 | 12243.98 | 36396.18 | 33893.01 | 45694.04 |
| II | Other Income | 158.89 | 144.44 | 121.84 | 486.45 | 291.95 | 466.94 |
| III | **Total Income (I + II)** | **12458.27** | **12199.29** | **12365.82** | **36882.63** | **34184.96** | **46160.98** |
| IV | **Expenses** | | | | | | |
| | (a) Cost of Goods Sold | 7702.84 | 7517.01 | 7590.56 | 22711.55 | 21046.51 | 28396.07 |
| | (b) Shipping and Handling Expenses | 1786.10 | 1669.72 | 1645.07 | 5076.28 | 4495.69 | 6065.60 |
| | (c) Sales and Marketing Expenses | 1747.57 | 1668.81 | 1628.72 | 5046.71 | 4486.04 | 6066.63 |
| | (d) Employee Benefit Expenses | 318.49 | 400.59 | 635.59 | 1196.99 | 1729.47 | 2273.87 |
| | (e) Finance Costs | 286.15 | 297.52 | 232.60 | 872.08 | 525.72 | 807.53 |
| | (f) Depreciation and Amortisation Expense | 24.22 | 24.79 | 26.99 | 74.42 | 83.79 | 110.32 |
| | (g) ther Expenses | 247.51 | 315.80 | 287.95 | 902.41 | 984.60 | 1332.77 |
| | **Total Expenses** | **12112.88** | **11894.24** | **12047.48** | **35880.44** | **33351.82** | **45052.79** |
| V | **Profit Before Tax (III - IV)** | **345.39** | **305.05** | **318.34** | **1002.19** | **833.14** | **1108.19** |
| VI | **Tax expense** | | | | | | |
| | (a) Current Tax | 16.33 | 12.56 | 10.45 | 49.08 | 32.76 | 25.40 |
| | (b) Deferred Tax | 107.47 | 47.34 | 133.34 | 209.10 | 203.62 | 241.41 |
| | (c) Income Tax (earlier years) | 0.00 | 0.03 | 0.09 | 0.03 | 0.18 | 0.18 |
| VII | **Net Profit for the Period (V - VI)** | **221.59** | **245.12** | **174.46** | **743.98** | **596.58** | **841.20** |
| VIII | Other Comprehensive Income (net of tax) | | | | | | |
| | (i) Items that will not be reclassified subsequently to Profit or Loss | | | | | | |
| | Remeasurement benefit of post employment defined benefit obligations | 0.32 | -4.15 | -4.75 | -8.00 | -14.25 | -5.41 |
| | Income tax effect on above | -0.05 | 1.11 | 1.28 | 2.18 | 3.84 | 1.44 |
| | (ii) Items that will be reclassified subsequently to Profit or Loss | | | | | | |
| | Gain/ (Loss) on fair value of investments in debt instruments through OCI | -5.91 | 0.46 | -5.96 | 5.34 | -15.99 | -31.61 |
| | Exchange differences on translation of financial statements of foreign operations | 13.70 | 107.51 | 131.13 | 106.79 | 615.79 | 519.42 |
| | Income tax effect on above | 1.64 | -0.13 | 1.66 | -1.49 | 4.45 | 8.79 |
| IX | **Total Comprehensive Income for the Period (VII + VIII)** | **231.29** | **349.92** | **297.82** | **848.80** | **1190.42** | **1333.83** |
| X | **Paid up Share Capital (face value of ₹ 10 each, fully paidup)** | **1473.17** | **1473.17** | **1473.17** | **1473.17** | **1473.17** | **1473.17** |
| XI | **Other equity (excluding Revaluation Reserve)** | | | | | | **16378.24** |
| XII | **Earnings per Equity Share (EPS) ( ₹ )** | | | | | | |
| | Basic and diluted EPS | 1.50 | 1.66 | 1.18 | 5.05 | 4.05 | 5.71 |
| XIII | **Additional Information on Standalone Financial Results is as follows:** | | | | | | |
| | Revenue from Operations | 146.43 | 137.06 | 196.55 | 432.79 | 558.57 | 631.82 |
| | Profit/(Loss) before Tax | 93.06 | 64.21 | 113.82 | 280.13 | 143.35 | 117.34 |
| | Profit/(Loss) after Tax | 5.98 | 42.09 | 6.22 | 130.72 | 37.35 | 14.05 |

**NOTES :**

1. The above consolidated results which are published in accordance with Regulation 33 of SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015 have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meetings held on 13 February 2024. The financial results are in accordance with the Indian Accounting Standards (Ind-AS) as prescribed under Section 133 of the Companies Act, 2013, read with the relevant Rules thereunder. These results have been subjected to a limited review by the Statutory Auditors of the Company who have issued unmodified conclusion thereon.
2. As on 31 December 2023, IntraSoft Technologies Group ("the Group") comprises the parent Company i.e. IntraSoft Technologies Limited and its five subsidiaries (including two step down subsidiaries).
3. As per the requirements of IND AS 108 as notified under Companies (Indian Accounting Standards) Rules 2015 as specified under Section 133 of the Companies Act, no disclosure is required for Segment reporting as the Company is operating in single business segment of Internet based delivery of products and services.
4. Deferred tax include reversal of MAT Credit Entitlement for FY 2008-2009 lapsed of Parent Company, amounting ₹ 61.30 lacs. (Corresponding quarter includes ₹ 89.01 lacs for FY 2007-2008)
5. Previous period figures have been re-grouped / re-classified wherever necessary, to conform to current period's classification.
6. The Consolidated financial results of the Company for the quarter and nine months ended 31 December 2023 are available on the Company's website www.itlindia.com.

For **IntraSoft Technologies Ltd.**
Sd/-
**Arvind Kajaria**
**Managing Director**
**DIN. 00106901**

Scan this QR code to download Unaudited Financial Results for the Quarter and Nine Months Ended 31 December 2023

Place: Kolkata
Dated: 13 February 2024




# SULA VINEYARDS LIMITED

**Registered Office Address:** 901, Solaris One, N S Phadke Marg, Andheri (E), Mumbai 400069, Maharashtra, India
**Tel:** 022-6128 0606/607 **Email:** info@sulawines.com **CIN:** L15549MH2003PLC139352

**EXTRACT OF CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31 DECEMBER 2023**

**INR in crore, unless otherwise stated**

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31 December 2023 (unaudited) | Nine Months ended 31 December 2023 (unaudited) | Quarter ended 31 December 2022 (unaudited) |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income | 218.94 | 480.83 | 210.02 |
| 2 | Net Profit before tax | 57.05 | 107.06 | 52.64 |
| 3 | Net Profit after tax | 42.98 | 79.76 | 39.28 |
| 4 | Total Comprehensive Income | 43.32 | 78.78 | 39.45 |
| 5 | Equity Share Capital (Face value of INR 2 each) | 16.88 | 16.88 | 16.84 |
| 6 | Reserves excluding revaluation reserve (i.e. Other Equity) | - | - | - |
| 7 | Earnings per equity share of face value INR 2 each (Not annualised for the quarters and nine months) | | | |
| | Basic (in INR) | 5.09 | 9.45 | 4.71 |
| | Diluted (in INR) | 5.09 | 9.45 | 4.71 |

**Notes:**

1. **Additional information on standalone financial results for the quarter and nine months ended 31 December 2023**

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31 December 2023 (unaudited) | Nine Months ended 31 December 2023 (unaudited) | Quarter ended 31 December 2022 (unaudited) |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income | 210.16 | 467.96 | 200.42 |
| 2 | Net Profit before tax | 55.22 | 108.36 | 52.59 |
| 3 | Net Profit after tax | 41.15 | 81.06 | 39.23 |
| 4 | Total Comprehensive Income | 41.46 | 80.30 | 39.39 |

2. The above is an extract of the detailed format of the financial results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.The full format of financial results for the quarter and nine months ended December 31, 2023 is available on the websites of the Stock Exchanges (www.bseindia.com and www.nseindia.com) and on the website of the Company (www. sulavineyards.com)
3. The above unaudited Financial Results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on 13 February 2024

For and on behalf of the Board of Directors
**Rajeev Samant**
CEO and Managing Director

**Place:** Mumbai
**Date:** 13 February 2024

सामना

## थोडक्यात

### हाफकिनचे अमित डोंगरे यांना डॉक्टरेट



**मुंबई :** हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळाचे जनसंपर्क अधिकारी अमित डोंगरे यांना विद्याशाखेतील 'लेबर स्टडीज' या विषयातील मुंबई विद्यापीठाची पीएचडी पदवी मिळाली आहे. डॉ. डोंगरे यांनी 'ॲनालिसिस ऑफ अवेअरनेस अबाऊट सायबर क्राईम अमंग बेनेफिशियरी ऑफ महाराष्ट्र लेबर वेल्फेअर बोर्ड इन मुंबई' या विषयात महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेच्या डॉ. पी. एम. कडुकर यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले. सायबर गुन्हे आणि सायबर सुरक्षिततेच्या बाबत एकंदरीत कामगार वर्ग, व्यवस्थापनांमध्ये असलेली जागरूकता, सायबर सुरक्षित राहण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याविषयी संशोधन केले आहे.

### गोरेगावात शिवकालीन शस्त्र प्रदर्शन आजपासून

**मुंबई :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मराठा साम्राज्याच्या शौर्य व पराक्रमाची गाथा सांगणाऱ्या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ आणि १७ फेब्रुवारी रोजी गोरेगाव पश्चिम आरे रोड येथील दळवी सभागृहात सकाळी १० ते रात्री १० या वेळेत हे प्रदर्शन पाहता येईल. पार्वतीबाई शंकरराव चव्हाण ट्रस्टचे अध्यक्ष सचिन चव्हाण यांनी या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.

# शीव कोळीवाड्यातील सिंधी वसाहतींचा पुनर्विकास होणार

**प्रकल्पासाठी म्हाडा विशेष प्राधिकरण | सहकारी संस्था स्थापन**

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) - शीव-कोळीवाड्यातील सिंधी निर्वासितांच्या २५ इमारतींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून हक्काच्या घराच्या प्रतीक्षेत असलेल्या या रहिवाशांना स्वतःचे घर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. या वसाहतीचा पुनर्विकास करण्यासाठी गुरु तेग बहादूर नगर सहकारी संस्था स्थापन करण्यात आली असून या ठिकाणी ४१ हजार ५०० चौ. मीटर क्षेत्रावर २५ इमारती व त्यात १ हजार २०० सदनिका होत्या. या इमारती पाडून टाकण्यात आल्या आहेत. मात्र रहिवाशांच्या व्यतिरिक्त उर्वरित जमिनीवर व्यावसायिक झोपड्यांचे अतिक्रमण आहे.

म्हाडामार्फत कन्स्ट्रक्शन ॲण्ड डेव्हलपमेंट एजन्सी नेमून या जमिनीवरील इमारतींचा पुनर्विकास करण्यात येईल. यासाठी म्हाडाला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता देण्यात आली आहे. या पुनर्विकासासाठी प्रत्येक इमारतीतील किमान ५१ टक्के किंवा पुनर्वसन योजनेमधील एकूण भाडेकरू किंवा रहिवाशांच्या किमान ६० टक्के भाडेकरुंची सहमती आवश्यक आहे. गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीमार्फत या प्रकल्पावर नियंत्रण ठेवण्यात येईल.



मंत्रिमंडळ निर्णय

### सुधारित रेती धोरणास मान्यता

अनधिकृत उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याच्या उद्देशाने शासनामार्फत ऑनलाईन पद्धतीने ग्राहकांना वाळू व रेती पुरविण्याबाबत सर्वंकष सुधारित रेती धोरणास मान्यता देण्यात आली. 'ना नफा-ना तोटा' तत्त्वावर वाळू विक्री दर निश्चित करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेशासाठी १ हजार २०० रुपये प्रति ब्रास (रुपये २६७/- प्रति टन) व मुंबई महानगर प्रदेश वगळून इतर क्षेत्राकरिता ६०० रुपये प्रति ब्रास (रुपये १३३/- प्रति टन) इतकी स्वामित्वधनाची रक्कम निश्चित केली आहे.

### राज्यात सहा नर्सिंग महाविद्यालये

राज्यात जळगाव, लातूर, बारामती, सांगली (मिरज), नंदुरबार व गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय नर्सिंग महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या शासकीय नर्सिंग महाविद्यालयांकरिता पहिल्या चार वर्षांसाठी सुमारे १७३ कोटी ८८ लाख रुपये इतका खर्च करण्यात येईल. पाचव्या वर्षापासून दरवर्षी सुमारे १३ कोटी ९९ लाख इतका निधी देण्यात येईल.

### *मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत सात हजार किमी रस्ते व पूल*

*मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत आणखी सात हजार किमी रस्ते व पूल बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या टप्पा-२ मध्ये १० हजार किमी लांबीचे रस्ते बांधण्यात येतील. या टप्प्यात महानगरपालिका, साखर कारखाने, औष्णिक विद्युत केंद्र, वाळू आणि खडीच्या खाणी, मोठ्या नद्या, औद्योगिक परिसरापासून १० किमीच्या आणि नगरपालिका, नगर परिषदा, छावणी बोर्ड हद्दीपासून पाच किमीच्या मर्यादेतल्या रस्त्यांचा दर्जा वाढविण्यात येईल.*

## फी न भरल्याने चार विद्यार्थ्यांची पोलीस ठाण्यात रवानगी



सोलापूर, दि. १४ (सा. वा.) - फी भरली नाही म्हणून शाळेने केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी चार विद्यार्थ्यांवर थेट कारवाई करत त्यांची रवानगी पोलीस ठाण्यात केल्याचा धक्कादायक प्रकार सोलापुरात उघडकीस आला आहे. या घटनेमुळे पोलीस आणि शाळेविरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे. कारवाई केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता नववी आणि पाचवीतील तीन मुली आणि एका मुलाचा समावेश आहे. सोलापूर शहरातील हिंदुस्थानी कव्हनेंट चर्च हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात ही घटना घडली.

हिंदुस्थानी कव्हनेंट चर्च हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात (एचसीसी) या इंग्रजी माध्यमात इयत्ता नववी आणि पाचवीमध्ये शिकत असलेल्या चार विद्यार्थ्यांची दुसऱ्या सत्राची फी भरण्यास पालकांना विलंब झाला होता. त्यामुळे या विद्यार्थ्यांना शाळेने चाचणी परीक्षेस बसू न देता त्यांना वर्गाबाहेर काढले. या विद्यार्थ्यांनी ही घटना पालकांना सांगितली. त्यानंतर पालकांनी प्राचार्यांना जाब विचारला. तसेच राहिलेली फीसुद्धा भरली. मात्र, पालकांनी जाब विचारल्याचा राग शाळेने मनात धरला. शाळेने पोलिसांकडे तक्रार करून विद्यार्थ्यांना घेऊन जाण्यास सांगितले.


## बृहन्मुंबई महानगरपालिका
### (जल अभियंता विभाग)
### ई-निविदा सूचना

| | |
|---|---|
| निविदा आयडी | २०२४_एमसीजीएम_१००३५०५ (शतमान दर तत्त्वावर) |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | एई (एम) डब्ल्यू डब्ल्यू शहर - II विभागा अंतर्गत भंडारवाडा हिल जलाशय आणि वरळी हिल जलाशयाच्या जागेमध्ये विविध ठिकाणी सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टीमचा पुरवठा, बसविणे, तपासणे आणि कार्यान्वित करणे. |
| छाननी शुल्क | रु. १७,७००.०० (रु. १५,०००/- + १८% जीएसटी) |
| ई-निविदेचे मूल्य (अंदाजे मूल्य) | रु. २,४७,७४,२३२.१६ |
| बोली सुरक्षा ठेव/ इरठे | रु. २४,८००.०० (इरठेच्या १०% चा भरणा ऑनलाइन पेमेंटद्वारे ) रु. २,२३,२००.०० (इरठेच्या ९०% चा भरणा ईई (एम) एमडब्ल्यू यांचे मुख्य लिपिक यांच्याकडे बोली सादरीकरणाच्या पुढील कामकाजाच्या दिवशी आणि लिफाफा ए उघडण्यापूर्वी) |
| कालावधी | ६ महिने (पावसाळ्यासह) |
| निविदेचे वितरण आणि विक्रीचा दिनांक | १५/०२/२०२४ रोजी ११.०० वा.पासून |
| निविदेच्या विक्रीसाठी आणि बोली सुरक्षा ठेव स्वीकृतीसाठी शेवटचा दिनांक आणि वेळ | २८/०२/२०२४ रोजी १२.०० वा.पर्यंत |
| लिफाफा ए, बी आणि लिफाफा सी चे सादरीकरण (ऑनलाइन) | २८/०२/२०२४ रोजी १६:०० वा.पर्यंत |
| पूर्व बोली बैठक | लागू नाही |
| लिफाफा ए उघडणे | ०१.०३.२०२४ रोजी १२.०५ वा.नंतर |
| लिफाफा बी उघडणे | ०४.०३.२०२४ रोजी १२.१० वा.नंतर |
| लिफाफा सी उघडणे | ०७.०३.२०२४ रोजी १५.०० वा.नंतर |
| संकेतस्थळ | http://mahatenders.gov.in |
| संपर्कासाठी व्यक्ती | १. श्री. पी. आर. कोल्हे (एसई):- ९८२०८८८४४९ २. श्री. पी.टी. शिंदे (एई) :- ९९३०२६०५०९ |
| पत्रव्यवहारासाठी पत्ता | कार्यकारी अभियंता (देखभाल), मिटर कार्यशाळा, बीएमसी, ५६६, एन.एम. जोशी मार्ग, 'एस' ब्रीजजवळ, भायकळा (प), मुंबई:- ४०००११ यांचे कार्यालय ई-मेल: aewwmcity01.he@mcgm.gov.in |
| बोली उघडण्यासाठी ठिकाण | कार्यकारी अभियंता (देखभाल), मिटर कार्यशाळा, बीएमसी, ५६६, एन.एम. जोशी मार्ग, 'एस' ब्रीजजवळ, भायकळा (प), मुंबई :- ४०००११ यांच्या कार्यालयामध्ये ऑनलाइन. |

**निविदा कागदपत्रे हस्तांतरीत करता येणार नाहीत.**

बृमनपा कोणतेही कारण दिल्याशिवाय वरील विषयासाठी कोणताही अर्ज स्विकारण्याचे किंवा स्विकारलेला कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

सही/- ई ई (एम) एम डब्ल्यू

सही/- उप जल अभियंता (देखभाल)

पीआरओ/२९०७/जाही/२०२३-२४ **वेळेत निदान, वाचवी प्राण**


## पतीने आईला वेळ, पैसा देणे पत्नीचा छळ नाही!

**सत्र न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण**

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) - जन्मदात्री आईसाठी पुरेसा वेळ देणे, तिला पैसे पुरवणे अशा प्रकारे पती जर त्याचे कर्तव्य निभावत असेल तर त्याच्या या कृत्यातून पत्नीचा छळ झाल्याचे म्हणता येणार नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण दिंडोशी सत्र न्यायालयाने नोंदवले. मंत्रालयात 'सहाय्यक' म्हणून सेवेत असलेल्या महिलेचा पोटगीचा दावा धुडकावताना न्यायालयाने हे मत व्यक्त केले.

अर्जदार महिलेच्या म्हणण्यानुसार, तिच्या पतीने सप्टेंबर १९९३ ते डिसेंबर २००४ या अवधीत परदेशात काम केले. तेथील नोकरी सोडल्यानंतर त्याने आईची भेट घेतली आणि तिला पैसे दिले. पतीने आईच्या मानसिक आजाराची वस्तुस्थिती लपवून ठेवली आणि माझी फसवणूक केली. तसेच सासू आणि पती वारंवार भांडण करून माझा छळ करतात, असा दावा महिलेने केला. तिच्या या आरोपांचे सासरच्यांनी खंडन केले. किंबहुना, पत्नीच क्रूरतेने वागत असल्याचा दावा करीत पतीने घटस्फोटासाठी अर्ज केला. त्यावर दंडाधिकारी न्यायालयाने सुरुवातीला महिलेला दरमहा तीन हजार रुपयांची अंतरिम पोटगी मंजूर केली. तथापि, सर्व पुरावे विचारात घेतल्यानंतर दंडाधिकाऱ्यांनी महिलेला अंतरिम पोटगी मंजूर करण्याचा आदेश मागे घेतला. त्या निर्णयाला आव्हान देत महिलेने दिंडोशी सत्र न्यायालयात अपील दाखल केले होते, मात्र न्यायाधीश आशीष अयाचित यांनी दंडाधिकाऱ्यांच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार देत महिलेचे अपील धुडकावून लावले.

## मूळ केंद्रचालकांकडून भुईभाडे घ्या!

**महाराष्ट्र दूध वितरक सेनेची मागणी**



मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) - आरे दुग्धशाळेच्या मूळ १०७ केंद्रचालकांकडून भुईभाडे घ्या, इतर केंद्रचालकांना मार्गदर्शन करून त्यांच्याकडून भाडे स्वीकारावे तसेच केंद्रचालकांनी भरलेली आगाऊ रक्कम त्यांना परत करा, अशी मागणी महाराष्ट्र दूध वितरक सेनेने बृहन्मुंबई दूध योजनेच्या महाव्यवस्थापकांकडे केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेने दिला.

आरे दुग्धशाळेअंतर्गत असलेल्या १०७ केंद्रांचे आदेश २०१९ साली रद्द केले आहेत. मूळ केंद्र चालकांकडून भुईभाडे घेतले जात नसल्यामुळे जानेवारी २०२३ मध्ये महाराष्ट्र दूध वितरक सेना आणि तत्कालीन महाव्यवस्थापक यांच्यामध्ये बैठक झाली होती. या बैठकीत मूळ केंद्र चालकांचे केवायसी करून त्यांच्याकडून भाडे घेण्यात यावे, असे आदेश महाव्यवस्थापकांनी दिले; परंतु महाव्यवस्थापकाकडून लेखी आदेश न मिळाल्याचे कारण देत स्थानिक डेअरी व्यवस्थापक भुईभाडे स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहेत, असा आरोप महाराष्ट्र दूध वितरक सेनेने केला आहे. बैठकीला महाराष्ट्र वितरक सेनेचे सरचिटणीस सतीश सावंत, कोषाध्यक्ष विलास भुजबळदेखील उपस्थित होते. दरम्यान, केंद्र चालकांचे प्रश्न न सुटल्यास तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा महाराष्ट्र दूध वितरक सेनेचे कार्याध्यक्ष राम कदम यांनी दिला.

## राष्ट्रवादीचे विलीनीकरण नाही

पुणे, दि. १४ (प्रतिनिधी) - काँग्रेसमध्ये विलीनीकरणाचा असा कुठलाही प्रस्ताव नसल्याचे सांगत ही चर्चा फेटाळून लावली राष्ट्रवादी काँग्रेसला नवीन चिन्ह मिळावं यासाठी चर्चा झाली नवीन चिन्ह आणि नाव घेऊन आम्ही निवडणुकीला सामोरे जाऊ असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी सांगितले.

शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांची बैठक पवार यांच्या मोदी बाग या निवासस्थानी झाली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील खासदार सुप्रिया सुळे, श्रीनिवास पाटील, डॉ. अमोल कोल्हे आमदार बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे, रोहित पवार यांच्यासह पक्षाचे आमदार, प्रमुख नेते उपस्थित होते. या बैठकीनंतर देशमुख पत्रकारांशी बोलत होते. शरद पवार यांची काल काँग्रेस नेत्यांशी झालेल्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन करण्यासंदर्भात चर्चा सुरू असल्याबद्दल विचारले असता अनिल देशमुख म्हणाले, असली कुठलीही चर्चा झालेली नाही. या निव्वळ अफवा आहेत. महाविकास आघाडीचे जे मिळावे आयोजित करण्यात आले आहेत ते कशा पद्धतीने करायचे, कोणते नेते एकत्रितपणे सभा घेतील याबद्दलची चर्चा झाली.

## न्हावा-शेवा बंदरात २८ लाख मोरपिसे जप्त

**डी आर आयचा तस्करांना दणका**

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) - खोटी माहिती देऊन लपूनछपून कोट्यवधी रुपये किमतीच्या मोराच्या पिसांची तस्करी करणाऱ्यांचा डाव डीआरआयने न्हावा-शेवा बंदरात हाणून पाडला. न्हावा- शेवा बंदरातून ही मोरांची पिसे गुपचूप चीनला नेण्यात येणार होती. पण डीआरआयने वेळीच कारवाई करीत दोन कोटी रुपये किमतीची २८ लाख मोराची पिसे हस्तगत केली. याप्रकरणी अटकेची कारवाईदेखील केली.

न्हावा-शेवा बंदरातून खोटी माहिती देऊन त्याआधारे मोराच्या पिसांची चीनला तस्करी केली जात असल्याची माहिती डीआरआयच्या पथकाला मिळाली. त्यानुसार मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने बंदरात चीनला पाठविण्यासाठी आणलेल्या मुद्देमालाची तपासणी केली असता त्यात मोराची पिसे व पिसाच्या कांड्या असा दोन कोटी रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. याप्रकरणी याची निर्यात करणाऱ्यास डीआरआयने अटक केली असून पुढील कारवाई सुरू आहे. जप्त केलेल्यामध्ये मोराची २८ लाख पिसे आणि १६ हजार पिसांच्या कांड्यांचा समावेश आहे.

## घरफोडी मास्टर भोईवाडा पोलिसांच्या जाळ्यात



गुन्हे वृत्त

***परळ*** परिसरात तीन लाखांची घरफोडी करून आजूबाजूच्या इमारतींमध्ये घरफोडीचा अयशस्वी प्रयत्न करून पसार झालेला घरफोडीत मास्टर असलेला सराईत गुन्हेगार अखेर भोईवाडा पोलिसांच्या जाळ्यात सापडला. कृष्णा रवी महेशकर (२७) असे त्याचे नाव असून त्याच्यावर घरफोडीचे २५ हून अधिक गुन्हे दाखल आहेत.

परळच्या हिंदमाता येथील सेंट पॉल स्ट्रीटवर असलेल्या भिवंडीवाला इमारतीत आठ तारखेच्या रात्री बंद घराचा कडीकोयंडा उचकटून चोरी झाली होती. आरोपीने घरातील कपाटातील सोन्याचे दागिने व रोकड असा तीन लाखांचा ऐवज चोरून नेला होता. त्यानंतर आजूबाजूला असलेल्या इमारतीत घुसून तेथेही त्याने काही बंद घरांना लक्ष्य केले होते; परंतु त्याच्याकडून बंद दरवाजाचा कडीकोयंडा तोडला गेला नाही. त्यामुळे त्याने तेथून पळ काढला होता. दरम्यान, ज्या घरात चोरी झाली त्यांच्या मालकाच्या ही बाब दुसऱ्या दिवशी लक्षात येताच त्यांनी भोईवाडा पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. याप्रकरणी घरफोडीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर वरिष्ठ निरीक्षक सुभाष बोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अमित कदम तसेच दयानंद साळुंखे, प्रकाश साळुंखे, काटे, रणधीर, सागर गस्ते, किरण दाईंगडे, सुळे, कोचरेकर, बिडवे असे दोन पथके बनवून आरोपीचा शोध सुरू केला. आरोपी हा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. त्यामुळे पोलिसांनी अभिलेख तपासला असता तो सराईत घरफोडी करणारा आरोपी असून आग्रीपाडा येथे राहत असल्याचे समजले. त्यामुळे कदम व पथकाने अधिक माहिती काढली असता तो मंगळवारी रात्री सातरस्ता परिसरात येणार असल्याचे कळताच तेथे सापळा रचून पोलिसांनी त्याला उचलले. त्याच्याकडून चोरीचा ऐवज हस्तगत करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले.

## गणपत गायकवाड तळोजा कारागृहात

*(पान १ वरून)* जमीन व्यवहारातील मांडवली फिस्कटल्याने २ फेब्रुवारी रोजी उल्हासनगरच्या हिललाईन पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल जगताप यांच्या दालनातच गणपत गायकवाड यांनी महेश गायकवाडवर गोळीबार केला होता. या प्रकरणी पोलिसांनी गणपत गायकवाड, संदीप सरवणकर, हर्षल केणे, विकी गणात्रा आणि रणजीत यादव या पाच जणांना अटक केली, तर गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव आणि नागेश बडेकर हे दोघे अद्याप फरार आहेत. पोलिसांची तीन पथके त्यांच्या मागावर आहेत. दरम्यान, ११ दिवसांची पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर आज सर्व आरोपींना चोपडा न्यायालयात आणण्यात आले. गोळीबारानंतर ३ फेब्रुवारीला गणपत गायकवाड यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्या वेळी त्यांच्या समर्थकांनी घोषणाबाजी केल्यावर त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकाराची पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये म्हणून भाजप कार्यकर्त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या.

### एक तास युक्तिवाद

न्यायालयात आज दोन्ही बाजूने एक तास युक्तिवाद चालला. सरकारी वकिलांनी आमदार गणपत गायकवाड यांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची मागणी केली. मात्र सरकारी पक्षाने न्यायालयासमोर कोणतेही नवीन मुद्दे आणले नसल्याचा युक्तिवाद गणपत गायकवाड यांच्या वकिलांनी केला. यानंतर न्यायालयाने गणपत गायकवाड यांच्यासह पाच आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली. सुनावणी पूर्ण होताच आरोपींची तत्काळ तळोजा कारागृहात रवानगी करण्यात आली.

### सुनावणी वेळी संचारबंदी

सुरक्षिततेच्या कारणाने सकाळी ९ वाजता सुनावणी घेण्यात आली. मोठ्या पोलीस बंदोबस्तात गणपत गायकवाड यांच्यासह सर्व आरोपींना चोपडा न्यायालयात हजर करण्यात आले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी उल्हासनगरमध्ये संचारबंदी लागू केली होती. शिवाय कोर्ट आवारात २०० मीटरपर्यंत रहदारी बंद केली होती.


## इंट्रासॉफ्ट टेक्नोलॉजी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः ५०२ ए, प्रथमेश, रघुवंशी मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०००१३
दूरः ९१-२२-४००४-०००८, फॅक्स : ९१-२२-२४९०-३१२३, ई-मेल : intrasoft@itindia.com
संकेतस्थळ : www.itindia.com सीआयएन : एल२४१३३एमएच१९९पीएलसी१९७८५७

**३१ डिसेंबर २०२३ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी एकत्रिकृत अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचे निवेदन**

रु. लाखांमध्ये

| तपशील | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले नऊ महिने | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३१-१२-२०२३ | ३०-०९-२०२३ | ३१-१२-२०२२ | ३१-१२-२०२३ | ३१-१२-२०२२ | ३१-०३-२०२३ |
| | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| उत्पन्न | | | | | | |
| I कार्यामधून महसूल | १२२९९.३८ | १२०५४.८५ | १२२४३.९८ | ३६३९६.१८ | ३३८९३.०१ | ४५६९४.०४ |
| II अन्य उत्पन्न | १५८.८९ | १४४.४४ | १२१.८४ | ४८६.४५ | २९१.९५ | ४६६.९४ |
| III एकूण उत्पन्न (I + II) | १२४५८.२७ | १२१९९.२९ | १२३६५.८२ | ३६८८२.६३ | ३४१८४.९६ | ४६१६०.९८ |
| IV खर्च | | | | | | |
| (ए) विक्री झालेल्या सामानाचे मूल्य | ७७०२.८४ | ७५१७.०१ | ७५९०.५६ | २२७११.५५ | २१०४६.५१ | २८३९६.०७ |
| (बी) वाहतूक आणि हाताळणी खर्च | १७८६.१० | १६६९.७२ | १६४५.०७ | ५०७६.२८ | ४४९५.६९ | ६०६५.६० |
| (सी) विक्री आणि पणन खर्च | १७४७.५७ | १६६८.८१ | १६२८.७२ | ५०४६.७१ | ४४८६.०४ | ६०६६.६३ |
| (डी) कर्मचारी हित खर्च | ३१८.४९ | ४००.५९ | ६३५.५९ | ११९६.९९ | १७२९.४७ | २२७३.८७ |
| (ई) वित्तिय शुल्क | २८६.१५ | २९७.५२ | २३२.६० | ८७२.०८ | ५२५.७२ | ८०७.५३ |
| (एफ) घसारा आणि ऋणमुक्ती | २४.२२ | २४.७९ | २६.९९ | ७४.४२ | ८३.७९ | ११०.३२ |
| (जी) अन्य खर्च | २४७.५१ | ३१५.८० | २८७.०५ | ९०२.४१ | ९८४.६० | १३३२.७७ |
| एकूण खर्च | १२११२.८८ | ११८९४.२४ | १२०४७.४८ | ३५८८०.४४ | ३३३५१.८२ | ४५०५२.७९ |
| V कर पूर्व नफा (III-IV) | ३४५.३९ | ३०५.३९ | ३१८.३४ | १००२.१९ | ८३३.१४ | ११०८.१९ |
| VI कर खर्च | | | | | | |
| (ए) चालू कर | १६.३३ | १२.५६ | १०.४५ | ४९.०८ | ३२.७६ | २५.४० |
| (बी) थकीत कर | १०७.४७ | ४७.३४ | १३३.३४ | २०९.१० | २०३.६२ | २४१.४१ |
| (सी) आयकर (अगोदरच्या वर्षांसाठी) | ०.०० | ०.०३ | ०.०९ | ०.०३ | ०.१८ | ०.१८ |
| VII कालावधीसाठी निव्वळ नफा (V-VI) | २२१.५९ | २४५.१२ | १७४.४६ | ७४३.९८ | ५९६.५८ | ८४१.२० |
| VIII अन्य सर्वंकष उत्पन्न (निव्वळ कर) | | | | | | |
| (i) परिभाषित सेवायोजना उपांत बंधनाच्या पश्चात लाभ पुनर्मोजणी नफा किंवा तोट्याच्या पश्चात पुनर्वर्गीकृत कारण्यात न आलेल्या बाबी | ०.३२ | -४.१५ | -४.७५ | -८.०० | -१४.२५ | -५.४१ |
| उपरोक्त वरील आयकर परिणाम | -०.०५ | १.११ | १.२८ | २.१८ | ३.८४ | १.४४ |
| (ii) ओसीआयद्वारे कर्ज दस्तावेजामधील गुंतवणुकीच्या निव्वळ मूल्यावरील नफा किंवा तोट्याच्या पश्चात पुनर्वर्गीकृत केलेल्या बाबी | -५.९१ | ०.४६ | -५.९६ | ५.३४ | -१५.९९ | -३१.६१ |
| परदेशी कार्यामधील आर्थिक निवेदनाच्या व्यवहारामधील विनिमय तफावत | १३.७० | १०७.५१ | १३१.१३ | १०६.७९ | ६१५.७९ | ५१९.४२ |
| उपरोक्त वरील आयकर परिणाम | १.६४ | -०.१३ | १.६६ | -१.४९ | ४.४५ | ८.७९ |
| IX कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (VII + VIII) | २३१.२९ | ३४९.९२ | २९७.८२ | ८४८.८० | ११९०.४२ | १३३३.८३ |
| X भरणा केलेले समभाग भांडवल (पूर्ण भरणा केलेले रु. १० प्रत्येकी दर्शनी मूल्य) | १४७३.१७ | १४७३.१७ | १४७३.१७ | १४७३.१७ | १४७३.१७ | १४७३.१७ |
| XI अन्य समभाग(पुनर्मुल्यांकित राखीव वगळता राखीव) | | | | | | १६३७८.२४ |
| XII प्रती समभाग उत्पन्न (ईपीएस) (रु) | | | | | | |
| मूळ आणि सौम्यीकृत ईपीएस | १.५० | १.६६ | १.१८ | ५.०५ | ४.०५ | ५.७१ |
| XIII एकमेव वित्तीय निष्कर्षामधील अतिरिक्त माहिती खालीलप्रमाणे | | | | | | |
| कार्यामधून महसूल | १४६.४३ | १३७.०६ | १९५.५५ | ४३२.७९ | ५५८.५७ | ६३१.८२ |
| कर पूर्व नफा/ (तोटा) | ९३.०६ | ६४.२१ | ११३.८२ | २८०.१३ | १४३.३५ | ११७.३४ |
| कर पश्चात नफा / (तोटा) | ५.९८ | ४२.०९ | ६.२२ | १३०.७२ | ३७.३५ | १४.०५ |

टिपाः

१. हे एकत्रित वित्तिय निष्कर्ष, कंपन्या (भारतीय लेखांकन प्रमाण) नियमावली, २०१५ सह वाचल्या जाणाऱ्या कंपन्या कायदा २०१३ ("कायदा") च्या कलम १३८, कंपन्या (भारतीय लेखांकन प्रमाण) (फेरफार), नियमावली, २०१६ च्या द्वारे फेरफार करण्यात आल्याप्रमाणे कंपनी कायदा, २०१३ च्या ("कायदा") अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या भारतीय लेखांकन प्रमाणाच्या मान्यतेच्या अनुसार तयार करण्यात आले आहेत. सदर निष्कर्षांचे लेखा समितीद्वारे समीक्षण करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाद्वारे १४ फेब्रुवारी २०२३ रोजी झालेल्या त्यांच्या सभेमध्ये संमत करण्यात आले आहेत.
२. ३१ डिसेंबर २०२३ रोजी संपलेले त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठीच्या निष्कर्षांचे कंपनीच्या संवैधानिक लेखा समितीद्वारे परीक्षण करण्यात आले आहे. कोणताही बदल नसलेला परीक्षण अहवाल जारी करण्यात आला आहे आणि उपरोक्त निष्कर्षासोबत स्टॉक एक्स्चेंजमध्ये सादर करण्यात आला आहे.
३. कंपनी कायद्याच्या कलम १३३ च्या अंतर्गत नमूद करण्यात आल्या नुसार कंपन्या (भारतीय लेखांकन प्रमाण) नियमावली २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या इंड एएस १०८ च्या गरजांच्या अनुसार उत्पादन आणि सेवांच्या आपूर्तीसाठी इंटरनेट आधारित विभागामध्येच कार्यरत असल्याने खुलासा आवश्यक नाही.
४. पूर्वीच्या वर्षांसाठी आयकर ज्यामध्ये आर्थिक वर्ष २००८-२००९ साठी एमएटी क्रेडीट एनटायटलमेंट, एकूण रक्कम रु. ६१.३० लक्ष आहे जे लॅप्स झाले आहे. (आर्थिक वर्ष २००७-२००८ साठी तस्तम कालावधीसाठी रु. ८९.०१ लक्ष समाविष्ट होते)
५. गत कालावधीचे आकडे चालू कालावधीसाठी सुसंगत करण्यासाठी आवश्यक तेथे पुनर्गठित/ पुनर्वर्गीकृत केले आहेत.
६. ३१ डिसेंबर २०२३ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्ष कंपनीच्या www.itlindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

३१ डिसेंबर २०२३रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष डाऊनलोड करण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा.

इंट्रासॉफ्ट टेक्नोलॉजीस लिमिटेड करिता

सही/- अरविंद कजारीया
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएनः ००१०६९०१

ठिकाणः कोलकाता
दिनांकितः १३ फेब्रुवारी, २०२४